# रुंदीकरणास मोठ्या पोलिस बंदोबस्तात सुरुवात




**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

शहर विकासासाठी व मेट्रो प्रकल्पासाठी शहरातील रस्ता रुंदीकरण गरजेचे असल्याने पालिकेने याबाबतीत पुढाकार घेत सोमवार 17 रोजी अंजुर फाटा ते कल्याण नाका या परिसरात रस्ता रुंदीकरण कामास सुरुवात केली. प्रभाग क्रमांक पाचचे सहाय्यक आयुक्त सईद चिवणे, बीटनिरीक्षक हनुमान म्हात्रे यांनी कल्याण नाका ते कमला हॉटेल या ठिकाणी जेसीबीच्या सहाय्याने कारवाईस सुरुवात केली.तर प्रभाग समिती क्रमांक चार चे सहाय्यक आयुक्त गिरीश गोष्टेकर,प्रभाग समिती क्रमांक तीन चे सहाय्यक आयुक्त सुरेंद्र भोईर यांच्या नेतृत्वाखाली पालिका पथकाने अंजुर फाटा येथून एकाच वेळेस या रस्ता रुंदीकरण कामास सुरुवात केली.यावेळेस प्रचंड मोठा असा पोलीस फौज फाटा सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन सांगळे यांच्या नेतृत्वाखाली तैनात करण्यात आला होता.दरम्यान अंजूरफाटा ते कल्याण नाका रस्ता लगतच्या अनेक मालमत्ता धारक व्यावसायिकांनी दुकानातील,निवासी फ्लॅट्स मधील कुटुंबीयांनी स्वतःहून आपले साहित्य रविवार पासूनच हलविण्यास सुरवात केली आहे.त्यामुळे नागरिकांचे सहकार्य या रस्ते रुंदीकरणाच्या माध्यमातून शहर विकास कार्यात मिळत असल्याचे प्रभाग समिती क्रमांक चार चे सहाय्यक आयुक्त गिरीश गोष्टेकर यांनी सांगितले आहे. शहरात होणाऱ्या विकास कामासोबत, रस्ते रुंदीकरण यास आमचा विरोध नसून हे करीत असताना पालिका प्रशासनाने बाधित मालमत्ता धारकांना विश्वासात घेणे गरजेचे होते अवघ्या दहा दिवसापूर्वी नोटीस बजावून त्यानंतर शनिवार सुट्टीच्या दिवशी 24 तासाची नोटीस बजावून ही कारवाई केली जात असून ती चुकीची असल्याचं सांगत येथील बाधित मालमत्ता धारकांना तात्काळ पंचनामे करून त्यांना योग्य तो मोबदला दिला गेला पाहिजे अशी मागणी बाधित मालमत्ता धारक दिनेश शेट्टी यांनी केली आहे. रविवारी येथील बाधित मालमत्ता धारकांनी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली असता त्यांनी सुद्धा ही कारवाई थांबविण्याचे व तत्पूर्वी पालिकेने बाधित मालमत्ता धारकांसोबत चर्चा करण्याचे निर्देश दिलेले असताना सुद्धा पालिका आयुक्त ही कारवाई पोलीस बळाचा वापर करून करत असल्याचा आरोप दिनेश शेट्टी यांनी केला आहे.




ठाणे : दिवा रेल्वे स्थानक पूर्वेला ठाकरे शिवसेनेकडून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त वंदन करण्यात आले. प्रसंगी भजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते प्रसंगी दिवा ठाकरे शिवसेनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### बबनराव पाचपुते यांच्या हस्ते 'दैनिक समर्थ गांवकरी' दिवाळी अंकाचे प्रकाशन!

श्रीगोंदा (अहिल्यानगर) (स. गांवकरी) : श्रीगोंदा माऊली येथे आयोजित सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री बबनराव पाचपुते दादा यांच्या हस्ते दैनिक समर्थ गांवकरी दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर साहित्यातील विविधतेला उजाळा देणारा हा अंक प्रकाशना पासूनच चर्चेचा विषय बनला आहे. यावेळी तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष तसेच समर्थ गांवकरीचे तालुका प्रतिनिधी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी दिवाळी अंकाच्या माध्यमातून ग्रामीण पत्रकारितेला मिळत असलेल्या बळाचे कौतुक केले. प्रकाशन प्रसंगी बोलताना बबनराव पाचपुते म्हणाले, "दैनिक समर्थ गांवकरी हा तालुक्याच्या प्रगतीसाठी, समस्यांसाठी आणि जनतेच्या आवाजासाठी सतत कार्यरत असलेला वृत्तवाहक आहे. दिवाळी अंक ही साहित्य, संस्कृती आणि समाजभानाचा सुंदर संगम साधणारी परंपरा असून याचा अभिमान वाटतो."



### खेळाडू कु. प्रणव रमेश पुंडे राज्यस्तरीय शालेय ज्युदो स्पर्धेत कांस्यपदक

अकोले (स. गांवकरी) : क्रीडा युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा परिषद , पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय ज्युदो क्रीडा स्पर्धा २०२५ - २६ नुकत्याच श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथे संपन्न झाल्या. या राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धेत अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे , अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय , अकोले या महाविद्यालयाचा १२ वी कला शाखेतील विद्यार्थी कु.प्रणव रमेश पुंडे याने १९ वर्षे ज्युदो ९० किलो खालील वजन गटात कांस्यपदक पटकावले या गुणवंत खेळाडूला क्रीडा शिक्षक प्रा.योगेश उगले व पै. मोहन बोऱ्हाडे यांचे मार्गदर्शन लाभले.यशस्वी खेळाडू व मार्गदर्शक क्रीडा शिक्षकांचे अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारी विश्वस्त मा.आमदार वैभवराव पिचड, कायम विश्वस्त गिरजाजी जाधव, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुनील दातीर, सेक्रेटरी सुधाकर देशमुख, खजिनदार धनंजय संत व सर्व कार्यकारिणी सदस्य, प्राचार्य डॉ. भास्कर शेळके, शिक्षण अधिकारी मालुंजकर एस.पी., प्रबंधक बगाड एस.बी., उपप्राचार्य प्रा. चांगदेव डोंगरे, पर्यवेक्षक विवेक वाकचौरे व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच क्रीडाप्रेमी यांनी हार्दिक अभिनंदन केले तसेच भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## *शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना* स्मृती दिनानिमित्त अभिवादन



**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती दिनानिमित्त दि.१७ नोव्हेंबर सोमवारी रोजी चौकातील फोटोला पुष्प हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

हिंदुरुदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त वसमत फाटा येथील बाळासाहेब ठाकरे चौकाचे पुजन शिवसेना (उबाठा ) जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांच्या हस्ते करून हार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करून जय घोष करण्यात आला.

यावेळी शिवसेना जिल्हा संघटक बालाजी कल्याणकर, शहर प्रमुख काजी सल्लावदिन, शिवसेनेचे ओमप्रकाश नागलमे,शेतकरी सेना तालुका प्रमुख रमेश पाटील क्षीरसागर, युवा सेना उपजिल्हाप्रमुख चेतन कल्याणकर, सोशल मीडिया तालुकाप्रमुख शेख रफीक, उपशहर प्रमुख होनाजी जोगदंड, शंकर हाफगुंडे,कॉंग्रेसचे मुन्ना देशमुख, विश्वनाथ कल्याणकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते .

# वीजेसंदर्भात प्रश्न विचारणाऱ्याला आ. लहामटेंनी लगावली श्रीमुखात

## माफी मागा अन्यथा आमदारांना फिरू देणार नाही, लिंगदेव ग्रामस्थांनी दिला इशारा



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील लिंगदेव येथील एका वाचनालयास आमदार डॉ. किरण लहामटे यांच्याकडून आर्थिक मदत निधी उपलब्ध करून देण्यात आला. यानिमित्त लिंगदेव येथे आयोजित कार्यक्रमास आ. लहामटे शनिवारी उपस्थित होते. मात्र या कार्यक्रमादरम्यान लिंगदेव येथील रहिवासी वाळीबा होलगीर यांनी आमदार लहामटेंना विजेचा लपंडाव व नियोजित औद्योगिक वसाहतीबाबत प्रश्न उपस्थित केला. मात्रा याचा राग धरून आमदार लहामटे यांनी कोणताही विचार न करता या प्रश्नकर्त्याच्या थेट श्रीमुखात भडकावली. ही घटना शनिवारी सकाळच्या सुमारास घडली.

ही घटना गंभीर असल्याने याची माहिती तालुक्यात वाऱ्यासारखी पसरली. पिडीत व्यक्ती व त्याचे कुटुंबियांवर राजकीय व प्रशासकीय दडपण आणून घटना दाबण्याचे काम सुरू झाल्याची चर्चा होती. नागरिकांनीही आमदार लहामटेंवर नाराजी व्यक्त करून याबाबत आमदारांनी गावकऱ्यांसमोर या घटनेबद्दल जाहीर माफी मागावी, नाहीतर त्यांना या परिसरातून फिरू देणार नाही, असा इशारा दिला.

## माजी आमदारांनी व्यक्त केला तीव्र शब्दांत निषेध

माजी आमदार वैभव पिचड यांनी देखील या घटनेचे सूतोवाच केलेच. नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केल्यावर पोटात लाथा व तोंडावर औद्योगिक वसाहतीचा नकाशा काढला जातो, असा उल्लेख करून आमदार लहामटेंवर त्यांनी जोरदार टीका केली. सोमवारी नागरिक व विविध राजकीय पक्ष कार्यकत्यांनी रस्त्यावर येऊन आमदार लहामटेंना दोषी ठरवून आरोप केले.

दोन थोबाडीत मारून ती घटना दाबण्यासाठी तडजोड म्हणून पैशांचे आमिष दाखविण्याचे आरोप आमदारांवर केले. असे असेल तर आमदारांच्या श्रीमुखात

देण्यास आम्हीही दोन हजार रूपये देतो, असा सूर लिंगदेव ग्रामस्थांनी आळवला. यानंतर लिंगदेव गावात येण्यास आमदार लहामटेना बंदी घालण्याचा निर्णय लिंगदेव ग्रामस्थांकडून घेण्यात आला. मात्र सायंकाळपर्यंत या संदर्भात अकोले पोलिस ठाण्यात आमदारांविरूद्ध लिंगदेव गावकऱ्यांकडून कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नव्हता.

मात्र याबाबतीतील पीडीत म्हणतात ते कितपत योग्य व सत्य आहे, आणि नेमका सत्य प्रकार काय आहे? तसेच नेमकी घटना काय घडलीय, त्याबाबतीत आमदार किरण लहामटे यांच्याकडून स्पष्टीकरण आल्यानंतरच समजू शकेल.

# नदीपात्रातून अवैध वाळूचा उपसा जोरात सुरू



**टाकळी ढोकेश्वर (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यात मुळा नदीपात्रातून व मांडओहोळ नदीपात्रातून अवैध वाळूचा उपसा जोरात सुरू आहे . दररोज तालुक्यातील प्रशासनाच्या नाकावर टिच्चून वाळू वाहतूक करणाऱ्या वाळू तस्कर याकडे पारनेर तहसीलदार तसेच पारनेर पोलिसांचे दुर्लक्ष होत आहे . हा उपसा तातडीने थांबवावा हो संबंधितांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी संबंधित गावातील ग्रामस्थांकडून होत आहे . खडकवाडी, पोखरी येथून खुलेआम वाळू वाहतूक सुरू आहे . पोखरी , पळशी , खडकवाडी(बोरवाक)वस्ती परिसरातील मांडओहोळ पात्रात तसेच पळशी गावातील मुळा नदीच्या परिसरात गेल्या काही दिवसांपासून बेसुमार अवैध वाळू उपसा सुरू आहे . याकडे पारनेर महसूल , पारनेर पोलीस प्रशासनाचे हेतू परस्पर दुर्लक्ष होत आहे . या अवैध वाळू वाहतुकीमुळे सततच्या वापरल्या जाणाऱ्या अवजड वाहतुकीमुळे परिसरातील रस्त्यांचीही अवस्था अत्यंत दयनीय होत आहे . त्यामुळे स्थानिकांनाही खड्डयांच्या रस्त्यांमधून वाट शोधावी लागत आहे . वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे रस्ते दुरस्त केल्यानंतरही तत्काळ खराब होतात . त्यामुळे वाहन चालक व स्थानिक नागरिकांचे हाल होत आहेत . त्यामुळे पारनेर पोलिसांनी व पारनेर महसूल प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे व बेकायदेशीर वाळू वाहतूक करणाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत अशी मागणी संबंधित गावातील लोकांमधून होत आहे. नदीपात्रातून वाळू वाहतूक केल्यानंतर वाळू धुण्यासाठी काही आड्डे आहेत ते अगदी रस्त्याच्या कडेला असूनही कोणत्याही अधिकाऱ्याला ते दिसत नाही हे नवलच. पारनेर तालुक्यात वाळू वाहतूक करणाऱ्या डंपरवर कुठल्याही प्रकारची नंबर प्लेट नसतानादेखील सर्रास वाळू वाहतूक केली जाते याकडे आरटीओचे दुर्लक्ष का. सदर मुळा नदी पात्र, मांडओहोळ नदीपात्रातून सर्रास वाळू उपसा होत असताना कुणीही अधिकारी कारवाई करताना या ठिकाणी दिसत नाही ही वाळू वाहतूक कोणाच्या आशीर्वादाने होत आहे यात काही देवाण-घेवाण तर नाही ना ?असा सवाल तालुक्यातील सामान्य लोकांना पडला आहे.




# स्वच्छता व संवर्धनासाठी सिंहगडावर या : खा. नीलेश लंके यांचे आवाहन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेतील सिंहगड किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व जपण्यासाठी पुढाकार घेत, खासदार नीलेश लंके यांनी राज्यातील शिवप्रेमी, पुणेकर नागरिक आणि तरुणाईला रविवार दि. २३ रोजी एकत्रित येण्याचे आवाहन केले आहे. "गड-किल्ले स्वच्छता आणि संवर्धन मोहीम" या उपक्रमाअंतर्गत या महिन्यात सिंहगडावर स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असल्याचे खासदार लंके यांनी सोमवारी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले. १६ मार्च रोजी शिवनेरीपासून सुरू झालेल्या या मोहिमेने धर्मवीर गड, रायरेश्वर, रामशेज, तिकोना, प्रतापगड आणि भुदरगड अशा विविध ऐतिहासिक किल्ल्यांना स्पर्श केला आहे. आता आठव्या टप्प्यात सिंहगडावर ही मोहीम आयोजित केली जात आहे. खासदार लंके यांनी गेल्या १० मार्च रोजी त्यांच्या वाढदिवशी हा उपक्रम जाहीर केला होता, ज्यात प्रत्येक महिन्याच्या एका रविवारी छत्रपती शिवाजी महाराजांच्या एका गडावर जाऊन स्वच्छता, संवर्धन व सांस्कृतिक जागृतीचे कार्य करण्याचा संकल्प आहे.

"शिवाजी महाराजांचे नाव घेतल्याशिवाय महाराष्ट्रात कोणताही उपक्रम सुरू होत नाही. त्यांच्या आदर्शांवरच आपण आजही उभे आहोत. मात्र, त्यांच्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देणारे गड दुर्दैवाने दुर्लक्षित आहेत," असे सांगताना लंके यांनी गड-किल्ल्यांची जपणूक ही सगळ्यांची सामाईक जबाबदारी असल्याचे आवर्जून सांगितले.

ही मोहीम 'आपला मावळा' या बिगर राजकीय संघटनेच्या माध्यमातून राबविण्यात येत असून, प्रत्येक किल्ल्यावर मोहिमेत सहभागी होणाऱ्या मावळ्यांची संख्या वाढत असल्याचे समाधान लंके यांनी व्यक्त केले.

मोहिमेद्वारे गडाच्या ऐतिहासिक पायाभूत रचनांचे संवर्धन, कचऱ्याचा नायनाट, तसेच देशभक्तीचे संस्कार प्रसारित करणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे.

सिंहगडावर येत्या रविवारी आयोजित करण्यात आलेल्या या मोहिमेत सहभागी होऊन शिवप्रेमी नागरिकांनी 'मावळा' म्हणून आपले योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. रविवारी सकाळी ७ वाजता गडाच्या पायथ्यापासून या मोहिमेला सुरुवात होणार आहे.

राज्याच्या विविध भागातून शिक्षणासाठी पुण्यात आलेले विद्यार्थी, ग्रामीण भागातील शिव प्रेमी तसेच ट्रेकर्स ग्रुप्सच्या सदस्यांनीही मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन आपला मावळा संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

## मोहिमेत मान्यवरांचा सहभाग

आजवर या मोहिमांमध्ये छत्रपती शाहू महाराज, आमदार जयंत पाटील, आमदार शशिकांत शिंदे, खासदार भास्कर भगरे, खासदार राजाभाऊ वाजे, आमदार हेमंत ओगले, जयश्री थोरात आदी मान्यवरांनी सक्रिय सहभागी होत स्वच्छता व संवर्धनास हातभार लावला आहे. विशेष बाब म्हणजे मोहिमेच्या आदल्या दिवशी खासदार नीलेश लंके यांनी प्रत्येक गडाच्या पायथ्याला जवळच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत मुक्काम करून मोहिमेत सहभागी मावळ्यांचा उत्साह वाढविण्याचा प्रयत्न केला आहे.

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/४४/२०२५ अकोले दि. १७/११/२०२५

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. विलास किसन बांडे, रा. लव्हाळी ओतुर**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये यांचे **वडील कै. किसन धोंडीबा बांडे यांचा मृत्यू दि. ०६/०२/२०२४** रोजी **मौजे लव्हाळी ओतुर** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत लव्हाळी ओतुर**, ता.अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. विलास किसन बांडे, रा. लव्हाळी ओतुर**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांचे **वडील कै. किसन धोंडीबा बांडे यांचा मृत्यू दि. ०६/०२/२०२४** रोजी **मौजे लव्हाळी ओतुर** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत लव्हाळी ओतुर**, ता.अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १७/११/२०२५ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क** — **हुकूमावरुन, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/४५/२०२५ अकोले दि. १७/११/२०२५

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. विलास किसन बांडे, रा. लव्हाळी ओतुर**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये यांचे **आजोबा कै. धोंडीबा लुमा बांडे यांचा मृत्यू दि. १५/१२/२००७** रोजी **मौजे लव्हाळी ओतुर** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत लव्हाळी ओतुर**, ता.अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. विलास किसन बांडे, रा. लव्हाळी ओतुर**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांचे **आजोबा कै. धोंडीबा लुमा बांडे यांचा मृत्यू दि. १५/१२/२००७** रोजी **मौजे लव्हाळी ओतुर** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत लव्हाळी ओतुर**, ता.अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १७/११/२०२५ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क** — **हुकूमावरुन, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/१११/२०२५ अकोले दि. १३/११/२०२५

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. उमर मगबुल मन्यार, रा. समशेरपुर,** ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **यांचा स्वतः उमर मगबुल मन्यार यांचा जन्म दि. ०१/०६/१९६७ रोजी समशेरपुर** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **समशेरपुर**, ता. अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. उमर मगबुल मन्यार, रा. समशेरपुर**, ता.अकोले जि. अहिल्यानगर **यांचा स्वतः उमर मगबुल मन्यार यांचा जन्म दि. ०१/०६/१९६७ रोजी समशेरपुर** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **समशेरपुर**, ता.अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १३/११/२०२५ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क** — **हुकूमावरुन, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**